श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळ, मूर्तिजापूर
द्वारा संचालित



# श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर, जि. अकोला

(NAAC 'B' Grade CGPA 2.40)

website : www.sgmmv.ac.in

दया धर्म सेवा कर्म

श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर

■ स्थापना : १९६३ ■

प्राचार्य

डॉ.संतोषराव माधवराव ठाकरे

Ph.D.,D.Litt. (Philosophy)

# माहिती पत्रक

## ❋ आमचे श्रध्दास्थान ❋



स्व.नानासाहेब तिडके



स्व.प्रतिभाताई तिडके

दया धर्म सेवा कर्म

**श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर**

■ स्थापना : १९६३ ■

## महाविद्यालयाचे बोधचिन्ह

## ❋ आमचे मार्गदर्शक ❋



# ॲड. भैय्यासाहेब तिडके
अध्यक्ष



श्री.शिरीषभाऊ तिडके
सचिव



डॉ. जयश्रीताई तोटे
कार्याध्यक्ष

# श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळ, मूर्तिजापूर

# श्री गाडगे महाराज महाविद्यालय,मूर्तिजापूर.
# (कला व वाणिज्य)

**(NAAC 'B' Grade CGPA 2.40)**

website : www.sgmmv.ac.in

दया धर्म सेवा कर्म

श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर

■ स्थापना : १९६३ ■

# माहिती पत्रक

## सत्र २०२०-२०२१


प्राचार्य

डॉ.संतोषराव ठाकरे

**Ph.D.,D.Litt. (Philosophy)**

# महाविद्यालयाच्या बोधचिन्हातील प्रतिकात्मक आशय

१) संत गाडगे बाबांचे आवडते भजन 'गोपाला गोपाला' दोन्ही हातवर करुन तल्लीन होवून डोलतांनाचा भास फुलातील सर्व पाकळ्यांच्या आकारातून होतो.

२) निळा आकाशाचा रंग हा विशालतेचे प्रतिक असून निळ्या रंगाच्या आकृतीला उघडलेल्या ग्रंथाचा आकार प्राप्त झाला तसेच दोन्ही पंख पसरवून प्रतिभेची उंच भरारीही तो दर्शवितो.

३) केवळ हिरव्या रंगाच्या पाकळ्यांकडे लक्ष दिल्यास करुणामयी ध्यानस्थ बुध्दाच्या डोळ्याचा आकार दिसतो.

४) निळा रंग – विशालता आणि शांततेचे प्रतिक आहे.

५) हिरवा रंग – समृध्दी आणि निसर्ग तत्त्वाचे प्रतिक आहे.

६) केशरी रंग – त्याग, वैराग्य व समर्पणाचे प्रतिक आहे.

७) गुलाबी रंग – आनंद, प्रसन्नता व प्रेमाचे प्रतिक आहे.

८) हिरवा व केशरी रंगातून राष्ट्रीयत्वाचीही जाणिव होते.

९) बोध चिन्हातील सरळ दोन रेषा मजबूत पाया व ठामपणा दर्शवितो.

## बोध वाक्य 'दया धर्म - सेवा कर्म' यातील

दया – असिम करुणा, प्रेम सांगतो.

धर्म – सदाचार, स्व–कर्तव्य सांगतो.
ज्या भूमिकेत आपण आहोत ती प्रामाणिकपणे पार पाडणे.

सेवा – सहृदयात्मक कृती, कृतज्ञता सांगतो.

कर्म – निष्कामपणे, कर्तव्यनिष्ठ भावनेने केलेली कृती सांगतो.

या बाबींचे महत्व विशद करणे, तसेच येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे अंगी या सर्व गोष्टी याव्या यासाठी आमचे प्रयत्न राहतील असेही सूचित करतात.

**● पाणी अडवा, पाणी जिरवा ●**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ।। विद्यापीठ गीत ।।

विद्या चिंतन । विद्या मंथन ।
विद्या सर्जन । विद्या जीवन ।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।। १ जनमन...

किती रंजले किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरून, कवेत घेता बांधव सगळे
भुतदयेच्या ओलाव्याने, मानस मोहरले ।। २ जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडुनि मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।। ३
जनमन जागर, करित निरंतर, विद्यापीठ चाले ।।

प्राचार्य डॉ.विठ्ठल वाघ

# महाविद्यालयाचे प्रार्थना गीत

हीच अमुची प्रार्थना
अन हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी
माणसासम वागणे

धर्म, जाती, प्रांत, भाषा
द्वेष सारे संपू दे
एक निष्ठा, एक आशा,
एक रंगी रंगू दे

अन् पुन्हा पसरो मनावर
शुध्दतेचे चांदणे
माणसाने माणसाशी
माणसासम वागणे

हीच अमुची प्रार्थना
अन हेच अमुचे मागणे
माणसाने माणसाशी
माणसासम वागणे

गीत – समीर सामंत (उबंटु–मधुन साभार)

दया धर्म सेवा कर्म

श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर

■ स्थापना : १९६३ ■

## MISSION

Shri Gadge Maharaj Mahavidyalaya, Murtizapur is Committed to provide educational facilities to poor rural students, to make them confident to inculcate in them the values of culture, of agriculture.... to commit ourselves to the teachings of Gadge Baba-the humanist to pursue excellence in all fields.

## VISION

1) To impart qualitative valuable service in the field of education to the residents of Murtizapur and nearby villages.
2) To produce competent, committed and courageous citizens through perfect discipline of the college.
3) To aim at overall personality development of the students through extracurricular activities in association with various social and cultural organisations.
4) To build, maintain and disseminate a culture conducive to meditating upon life's mission with a selfless attitude.
5) To provide opportunity to the students to face all sorts of the challenges of the dynamic world, with utilisation of their potential in sports, athletic and other activities.
6) To translate the ideal of Gadge Baba "Seva Parmo Dharma" into practice using our resources and facilities in the field of education.

## GOALS

1) To Provide the educational facilities of the students of rulral area with minimum cost.
2) To give business-oriented education to the students.
3) To give education fo the overall personality development of the students.
4) To guide the students to get success in the competitive examinations.
5) To create the social responsibility among the students.

## संस्थेची पार्श्वभुमी-प्रेरणा :

श्री. संत गाडगे बाबांनी स्थापन केलेली श्री गाडगे महाराज विद्यालय मंडळ ही संस्था असून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या संस्थेची घटनेची रूपरेखा तयार करुन दिली तसेच डॉ.भाऊसाहेब उपाख्य, पंजाबराव देशमुख यांनी या संस्थेला जवळ-जवळ दहा एकरहून अधिक जागा मिळवून दिली. अशा महापुरूषांच्या योगदानातुन ही संस्था उभी झालेली आहे.

'शिक्षणावाचून माणूस म्हणजे धोंडा' असे किर्तनातून सांगणाऱ्या गाडगेबाबांनी स्वतःच्या हयातीत १९५२ साली मूर्तिजापुरात स्थापन केलेल्या विद्यालयास सक्रीय सहकार्य दिले. संस्थाचालकांनी संस्थेला गाडगे बाबांचे नाव देऊन त्यांची प्रबोधनरुप स्मृती जोपासली.

विद्यालय, महाविद्यालय, अनाथ विद्यार्थी वसतिगृह, मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, कन्या विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, इंग्लीश कॉन्व्हेन्ट, अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र अशा संस्थांनी मुर्तिजापूरच्या सांस्कृतिक, शैक्षणिक वातावरणावर गाडगे बाबांच्या संस्काराची मोहर उमटविली. दुर्गवाडा, शिवण अशा ग्रामीण भागातील बाबांचे शैक्षणिक कार्य संस्थेच्या रुपाने पोहचले आहे.

शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांनी विद्यालयासाठी आपली प्रतिष्ठा खर्ची घालून शासनाकडून जमीन मिळवून दिली, तर महाविद्यालयाचा जवळपास १० एकर एवढा विस्तीर्ण परिसर स्व.आमदार प्रतिभाताई तिडके यांनी स्वप्रयत्नांनी शासनाकडून मिळवून दिला. सद्यःस्थितीत मा.भैय्यासाहेब उपाख्य ॲड.सुहासराव तिडके (माजी आमदार) हे संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहत असून त्यांच्या मार्गदर्शनात संस्था प्रगतीकडे वाटचाल करीत आहे.

राजकारण निरपेक्ष शैक्षणिक कार्य करणारे हे महाविद्यालय १९६३ साली स्थापन करण्यात आले. गाडगेबाबांच्या शैक्षणिक प्रेरणेने संस्थेच्या महाविद्यालयाची वाटचाल प्रभावीपणे चालू आहे.

## कर्मयोगी संत श्री. गाडगे बाबा आणि त्यांची शिकवण :

महाराष्ट्राची ही भूमी वीरांची, कलावंतांची व संतमहंताची कर्मभूमीच म्हटली पाहिजे. या भूमीत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा आदी संतांच्या अवतारकार्यामुळे संतमालिका सुरु झाली. या मालिकेचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला नामदेवांनी त्याचा भारतभर विस्तार केला. नाथांनी त्यांवर इमारत बांधली व तुकारामांनी त्यावर कळस चढविला, उरलेले कार्य संत गाडगे बाबांनी सिध्दीस नेले. म्हणूनच संत गाडगे बाबा या मालिकेतील शिरोमणी समजले जातात. गाडगेबाबांनी समाजात धर्माच्या नावाखाली होत असलेल्या अन्याय, अत्याचार व अनीती दूर करण्यासाठी ते जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत झगडले. सुमारे पन्नास–साठ वर्षे निःस्वार्थबुध्दीने सेवा केली. मानवता, समाजसेवा, मानवधर्म यांचे दर्शन गाडगेबाबांच्या जीवनात पदोपदी घडते.

भ्रमंतीच्या काळात बाबांनी जे काही कार्य केले ते विलक्षण प्रकारचेच म्हटले पाहिजे. अकस्मात कोणालाही हाक मारुन झाडू मारुन घ्यावा. घरासमोरील पटांगण व आजूबाजुची जागा साफ करावी व घरमालकास झाडू परत करावा. गावातील विहिरीवर जाऊन पाणी भरणाऱ्या मंडळीकडून बादली घ्यावी व विहिरीचे झपाझप पाणी काढून उन्हात तापत असणाऱ्या गुरांना पाणी पाजावे, शेतात कापणी सुरु असेल त्यावेळी जाऊन विळा मागून कापणी करावी. कुणी भाकरीचा तुकडा दिला तर खावा नाहितर तसेच निघून जावे. वाटेत ओझे वाहणारी बाई दिसली तर तिचे ओझे स्वतःच्या डोक्यावर घेऊन तिचे घरी पोहोचते करावे. अशी वरवर पाहता चमत्कारीक वाटणारी कामे ते करीत.

गाडगे बाबा ऋणमोचन यात्रेस दरवर्षी येत असत. हातात खराटा घेऊन स्वतः घाण साफ करण्याचे काम करीत. पूर्णा नदीवर पक्के घाट नव्हते. त्यामुळे निसरडे होत असे, लोक घसरुन पडत. त्या निसरडीवर माती व रेती बाबा स्वतः टाकत. पूढे बाबांनी जनतेच्या सहाय्याने घाटाचे दगडी बांधकाम केले. यात्रेच्या दिवसात अतिशय घाण होत असे. बाबांनी स्वतः खराटा हातात घेऊन स्वच्छतेची मोहीम सुरु केली. त्यामुळे आपोआपच रोगराईला आळा बसला. या सेवाकार्यामुळे लोक बाबांना वंदन करु लागले. येथूनच बाबांच्या सार्वजनिक जीवनाला आरंभ झाला.

बारा वर्षाच्या थोर तपश्चर्येनंतर गाडगे बाबांना वाटू लागले की, आता आपल्याला समाजाच्या हितासाठी चार गोष्टी समाजासमोर ठेवल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांनी कथा–किर्तन सांगण्यास सुरुवात केली. जेथे जाणे होईल तेथील लोकांना

एकत्र करुन त्यांचेसमोर ते आपल्या किर्तनाद्वारे आपले विचार मांडू लागले. त्यामुळे पुढे किर्तनाचे कार्यक्रम जाहीररित्या होऊ लागले.

गाडगेबाबा अंधविश्वास, परंपरागत रुढी, धर्माचे नावावर होणारे शोषण या गोष्टीचे कट्टर विरोधक होते. मूर्तिपुजेपेक्षा गोरगरिबांच्या सेवेकडे त्यांचे अधिक लक्ष होते. सामाजिक सुधारणा व्हावी, दारुबंदी व्हावी, उच्च–निच ही भेदभावाची कल्पना मानवाचे मनातून निघून जावी. सर्वत्र शिक्षणाचा प्रसार व्हावा या उदात्त कार्यासाठी त्यांनी सारी हयात खर्च केली. राष्ट्रीय व सामाजिक ऐक्यासाठी त्यांनी जे महाकार्य केले त्याला तोड नाही. शतके येतील व जातील पण भावी पिढीपुढे बाबांच्या कार्याचा आदर्श खचितच राहिल. बाबांनी शोषण, काळाबाजार, व्यापारीवर्गाद्वारे होणारी शेतकऱ्यांची लूट या गोष्टीवर आपल्या किर्तनातून भरपूर प्रकाश टाकला. म्हणूनच बाबांना 'समाजवादी संत' हे नामाभिमान शोभते. दीनदुबळयांची सेवा हे त्यांच्या जीवनाचे व्रत त्यांच्या दशसूत्रीतून दिसून येते ती दशसूत्री शेवटी दिलेली आहे. या दशसूत्रीचे पालन म्हणजेच ते खरा धर्म समजत असे, यालाच ते ईश्वराची खरी सेवा मानीत. या महाविद्यालयातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ही बाबांची मानवता–वादीच नव्हे, तर भूतदयावादी शिकवण रूजविणे हे मी माझे अहोभाग्य समजतो ही जबाबदारी माझेवर नियतीने टाकली ती मी सहर्ष स्वीकारली आहे. येथे शिकवणाऱ्या विद्यार्थ्यांवर व्यक्तिगत तसेच सामाजिक जाणिवेचे संस्कार करणे हे आम्हा सर्व शिक्षकांची जबाबदारी आहे.

विद्यार्थ्यांच्या लेखण कौशल्याचा विकास व्हावा म्हणुन महाविद्यालय दरवर्षी नियमितपणे 'स्वस्ती' 卐 हा वार्षिकांक प्रकाशित करीत आहे. विद्यार्थ्यांना लिहिते करावे त्यांच्यातील सुप्त प्रतिभा बाहेर काढावी. कथा, कविता, लेख, व्यंगचित्र, मुलाखत, रेखाटणे, आदिंचा स्वस्तीमध्ये समावेश केला जातो. सर्जनाच्या प्रक्रियेत सर्वांनी सहभागी व्हावे. आपले लेख, कथा, कविता, रेखाटणे पाठवावी. ज्यातून नवलेखक, नवकवि, चित्रकार यांच्यातील प्रतिभेला विकसित करण्यासाठी स्वस्ती हा वार्षिकांक एक सुसंधी आहे.

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपुर्वक स्वागत..!

**मूर्तिजापूर**

**डॉ.संतोषराव ठाकरे**
प्राचार्य

दया धर्म सेवा कर्म

श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर

■ स्थापना : १९६३ ■

# Best Practices

## सामाजिक उत्तरदायीत्व

### दु:खी व निराशांना - हिंमत

* देशासाठी शहीद झालेल्या व लढत असलेल्या सैनिकांच्या,
* देशांतर्गत सुरक्षेमध्ये शहीद झालेल्या पोलिसांच्या,
* तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या

पाल्यांकडून या महाविद्यालयात कुठलेही शुल्क आकारल्या जाणार नाही. त्यांचा या महाविद्यालयातील शिक्षणाचा संपूर्ण खर्च महाविद्यालय वहन करेल. यासाठी प्राध्यापक डॉ.अनिल ठाकरे यांच्याशी संपर्क साधावा. गणवेश खंडेलवाल क्लॉथ स्टोअर्स यांचे सौजन्याने देण्यात येईल.

### मायेचा आधार

वडील नसलेल्या व आईवरच मुलीच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी असलेल्या विद्यार्थीनींना प्राचार्याकडून मोफत गणवेश.

**डॉ.संतोष ठाकरे**
प्राचार्य

**● पर्यावरणाचे रक्षण करा, प्लॅस्टीकचा वापर टाळा. ●**

**महाविद्यालयात प्लॅस्टीक वापरावर बंदी आहे.**

**आढळल्यास रु. १००/- पर्यंत दंड आकारल्या जाईल.**

दया धर्म सेवा कर्म

श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर

स्थापना : १९६३

## महाविद्यालयामध्ये प्रवेशासंबंधी –

१. केंद्र व राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांनी उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, शालांत परीक्षा व विद्यापीठाने मान्य केलेली तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे त्रिवर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी तसेच उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जाईल.

२. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज पात्रता परीक्षेचा निकाल लागल्यापासुन १० दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या कार्यालयात पोहोचले पाहिजेत. १० दिवसांच्या कालावधीत कार्यालयात न पोहोचणारे प्रवेश अर्ज सादर करतांनाच प्रवेशाच्या तारखेविषयी माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३. प्रवेश मिळविण्यासाठी माहितीपत्रासोबत जोडलेला प्रवेश अर्ज भरून द्यावा. लागेल. तो विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातच असणे गरजेचे आहे व त्यावर माहितीपत्रकांच्या शर्थींना मान्यता देणारी विद्यार्थ्यांच्या वडिलांची, आईची किंवा पालकाची सही असावयास पाहिजे.

● महाविद्यालयात प्रवेश देतांना विद्यार्थ्यांकडून त्याच्या पात्रता प्राप्त परिक्षेच्या मूळ गणेपत्रिका तसेच शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या मुळ प्रती घेण्यात येतात. एकदा महाविद्यालयात मुळ दाखले / गुणपत्रिका सादर केल्यानंतर त्यांना कोणत्याही परिस्थीतीत परत मिळणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यापुर्वी गुणपत्रिका शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रती स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती / जमातीच्या, वि.मा. भ.ज., इ.मा.व. विद्यार्थ्यांनी जातीचे प्रमाणपत्राच्या प्रती प्रवेशापुर्वीच काढुन ठेवाव्यात.

**प्रवेश अर्जासोबत पुढील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्य प्रतिलिपी जोडाव्यात.**

(मुळ प्रमाणपत्रे जोडु नयेत.)

१. अर्जदार यापुर्वी ज्या शाळा/महाविद्यालयात शिकत होता ती शाळा/महाविद्यालय सोडल्याचा अधिकृत दाखला.

२. अर्जदाराने शेवटची परीक्षा उत्तीर्ण केल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला समाधान–कारक पुरावा तसेच शिक्षणात खंड पडला असल्यास त्या कालावधीचे स्पष्टीकरणात्मक अधिकृत प्रतिज्ञापत्र दंडाधिकारी यांच्या समोर केलेले.

३. मागील परीक्षेमध्ये प्रत्येक विषयांत मिळालेल्या गुणांचा स्पष्ट उल्लेख असलेली अधिकृत गुणपत्रिका.

४. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अथवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या व्यतिरिक्त अन्य विद्यापीठाचे वा मंडळाचे विद्यार्थी असल्यास स्थानांतरण प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

५. नामांकनासाठी ठराविक नमुन्यातच आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदन पत्रासोबत नामांकन शुल्क व पात्रता परीक्षेची मूळ गुणपत्रिका जोडावी लागेल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ह्यांची उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्या व्यतिरिक्त इतर मंडळाची/विद्यापीठाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण होवून प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक उमेदवारास महाविद्यालयात प्रवेश न घेता बहिःशाल विद्यार्थी म्हणून परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवेश घेत असेल तर अशा विद्यार्थ्यांनाही नामांकन आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदनपत्र ठरवून दिलेल्या मुदतीत भरले पाहिजे. मुदतीनंतर विलंब शुल्क आकारले जाईल.

६) चार पासपोर्ट साईज कलर फोटो, ठराविक नमुन्यात नसलेले, व्यवस्थित माहिती न भरलेले, आवश्यक प्रमाणपत्रांच्या

साक्षांकित सत्य प्रतिलिपी न जोडलेले व निकालापासून १० दिवसांचे आत कार्यालयात न पोहोचणारे अर्ज प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

१. प्रवेश घेतेवेळी प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती दाखविणे आवश्यक राहील.

२. शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दुय्यम दाखला असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

३. एकदा घेतलेल्या ऐच्छिक विषयात प्रवेश घेतल्यापासून तीस दिवसानंतर बदल करुन दिल्या जाणार नाही. तसेच सत्राच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे नाव ज्या तुकडीमध्ये समाविष्ट करण्यात आले असेल त्याच तुकडीमध्ये राहील. तुकडी बदलवून दिली जाणार नाही.

**७. प्रवेशा संबंधीत कोणत्याही प्रश्नाबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहिल.**

क) खालील कारणास्तव विद्यार्थ्यांचे नाव महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

१. महाविद्यालयाच्या शुल्कांचा भरणा न करणे.

२. आवश्यक त्या शैक्षणीक पात्रतेस न पोहचणे.

३. प्राचार्यांच्या मतानुसार असमाधानकारक वर्तणूक असणे.

४. महाविद्यालयीन परीक्षांना न बसणाऱ्या व आवश्यक त्या शैक्षणिक पात्रतेस न पोहोचणाऱ्या किंवा प्रत्येक विषयात कमीत कमी ७५% व्याख्यानांना हजर न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्र परीक्षेस बसू दिले जाणार नाही. तसेच शारीरिक शिक्षणाच्या तासांपैकी ८० टक्के तासांना हजर न राहिल्यास विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेस बसू दिले जाणार नाही व त्यास महाविद्यालयाच्या पटावरुन कमी केले जाईल.

ड) **विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र नेमून दिलेल्या तारखेच्या आत भरणे ही सर्वस्वी विद्यार्थ्यांची जबाबदारी राहिल. दिलेल्या तारखेच्या आत आवेदनपत्र न भरल्यास, शेवटच्या तारखेनंतर ते भरण्याची कुठल्याही परिस्थितीत परवानगी देण्यात येणार नाही.**

इ) प्रत्येक वर्गासाठी राखीव जागा खालीलप्रमाणे राहतील.

| | |
|---|---|
| १. अनुसुचित जाती व अनुसूचीत जातीमधील बौध्दधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| २. अनुसुचित जमाती | ७ टक्के |
| ३. विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| ४. भटक्या जाती (जाने १९९० पुर्वीच्या २८ तत्सम जाती) | २.५ टक्के |
| ५. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| ६. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| ७. इतर मागासवर्गीयांकरिता | १९ टक्के |
| ८. सवर्ण आरक्षण | १० टक्के |

**टिप :** अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त भटक्या जाती/जमाती व इतर मागासवर्गीय, वि.मा.प्र. विद्यार्थ्यांकरिता शासन नियमानुसार जागा राखीव ठेवण्यात येईल.

महाविद्यालयातील उपलब्ध जागांच्या पाच टक्के जागा क्रिडा, वक्तृत्व, वाद-विवाद इत्यादीतील नैपुण्य लक्षात घेऊन भरण्याचा विशेषाधिकार प्राचार्यांना राहील.

# शुल्क

**शुल्कासाठी (परिशिष्ट–अ आणि अ/१) बघावे.**

१. विद्यार्थ्यांस महाविद्यालयात प्रवेश कोणत्याही तारखेस मिळाला असला किंवा त्याने/तिने महाविद्यालय कोणत्याही तारखेस सोडले तरी त्याला / तिला संपूर्ण शैक्षणिक वर्षा साठी शिक्षण शुल्क द्यावे लागेल. एखाद्या विद्यार्थ्याला काही कारणाने महाविद्यालय सोडावयाचे असेल तर तसेच खास कारण असल्याशिवाय शुल्कात (शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क) सवलत मिळणार नाही. मात्र या राज्यातील व अन्य महाविद्यालयात अथवा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षण विभागातून सत्राच्या मध्येच महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अन्य महाविद्यालयाच्या पटावर त्याचे नाव असेपर्यंत कालावधीचे शिक्षण शुल्क द्यावे लागणार नाही.

२. महाविद्यालयाच्या कार्यालयात शुल्क भरल्यानंतर कार्यालय कर्मचारी आवश्यक त्या नोंदी घेवून सही करतील व छापील पावती देतील. विद्यार्थ्यांनी ती काळजीपूर्वक जतन करुन ठेवली पाहिजे. मूळ शुल्क पावती हरवल्यास त्या बाबतचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यासाठी कार्यालयास रु. २५/– भरावे लागतील.

३. महाविद्यालयात प्रवेश झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांने कार्यालयातुन आपले ओळखपत्र तयार करुन घेणे अनिवार्य आहे. ओळखपत्र हरविल्यास नवीन ओळखपत्र मिळविण्या–करिता रु. ५०/– दंड म्हणुन आकारण्यात येईल.

**● महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवावा. ●**

**● नेहमी ओळखपत्र जवळ ठेवावे. ●**

## शिक्षण शुल्क परत करण्यासंबंधीचे नियम

या महाविद्यालयात प्रवेश मिळालेले विद्यार्थी जर कृषी, स्थापत्य, वैद्यकीय (ज्यात दंतशास्त्र व आयुर्वेद यांचा समावेश आहे) शिक्षण पदविका व इतर तत्सम व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालय सोडून जातील तर त्यांनी भरलेले संपूर्ण शिक्षण शुल्क त्यांना परत मिळू शकेल मात्र –

- व्यावसायिक महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून पहिल्या पंधरवाड्याच्या आत महा–विद्यालयातून शिक्षण शुल्क परत घ्यावयाचे असेल तर, प्राचार्यांकडे पूर्वी भरलेले शुल्क मिळविण्यासाठी लेखी अर्ज केला पाहिजे. प्रत्यक्ष ज्या व्यावसायिक महाविद्यालयात विद्यार्थ्यांने प्रवेश घेतला असेल तेथे प्रवेशाकरिता केलेल्या अर्जाच्या तारखेचा व प्रवेश मिळाल्याचा तारखेचा निर्देश असलेले त्या महाविद्यालयाच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र हे शुल्क परत मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जासोबत पाठविणे जरुरीचे आहे.

## सवलती व विद्यावेतने

शासनामार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्या, शिष्यवृत्त्या आणि विद्या–वेतने यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधून मुदतीच्या आत आपली आवेदनपत्रे सादर करणे आवश्यक आहे. या करिता कार्यालयाद्वारे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांकडे त्यांनी लक्ष ठेवावे.

मुदतीत अर्ज सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पात्रताप्राप्त विद्यार्थ्यांचीच राहील. आवेदन पत्राशिवाय अधिछात्रावृत्ती / शिष्यवृत्ती / विद्यावेतन दिले जाणार नाही.

या संदर्भात सूचना फलकावर वेळोवेळी लावलेल्या सूचना बघाव्यात.

**● वृक्ष लावा, वृक्ष जगवा. ●**

## ई.बी.सी. सवलतीबबत माहिती

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिल्या जाते. दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१६ च्या महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक टीईएम–२०१६/प्र.क्र.५०१/तांशि–४ नुसार ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रूपये २.५० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यास ५०% शिक्षणशुल्क माफीची सवलत दिल्या जाईल. **त्यासाठी प्रवेशाचे दिनांकापासून १५ दिवसात अर्ज करावा लागेल.**

**ई.बी.सी. सवलत मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे खालीप्रमाणे–**

१) तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे पालकाचे रूपये २,५०,००० पर्यंतचे उत्पन्न प्रमाणपत्र

२) वडील हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्राची सत्यप्रत.

३) रेशनकार्डची सत्यप्रत.

४) आधारकार्डची सत्यप्रत.

**टिप–दस्तावेजाच्या अपूर्ततेमुळे वा इतर कारणांमुळे ई.बी.सी. सवलत मंजुर न झाल्यास सबंधित विद्यार्थ्यास संपूर्ण फी भरावी लागेल.**

## शिष्यवृत्ती

● **अपंग शिष्यवृत्ती :** प्रत्येक अपंग विद्यार्थ्याला अपंग शिष्यवृत्ती मिळु शकते. यासाठी अपंग असल्याबद्दलचा जिल्हा शक्य चिकित्सक (सिव्हिल सर्जन) यांचा दाखला आवश्यक आहे. शिष्यवृत्तीसाठी अर्ज विहीत नमुन्यात करण्याची शेवटची **तारीख ३१ ऑगस्ट** आहे. परंतु कोविड–१९ मुळे बदल संभवतो.

● **प्राथमिक शाळा शिक्षकांच्या मुलांना मेरीट स्कॉलरशिप :** प्राथमिक शाळा शिक्षकांच्या ज्या मुलांना परिक्षेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले त्यांना ही शिष्यवृत्ती मिळु शकते. प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसांचे आत यासाठी अर्ज करावा लागतो.

## शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची पध्दत :

सर्व मागासवर्गाच्या व कमी उत्पन्नाच्या वर्गात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करावेत. अर्ज सर्व दृष्टीने पूर्ण असावा. खोटी माहिती दिल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती साठी अपात्र ठरविले जाईल. ज्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल त्यांनी त्या काळात तो काय करीत होता या संबंधी न्यायालयसमक्ष केलेले प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्ती फॉर्म भरतेवेळी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे खाते उघडणे आवश्यक आहे. जर विद्यार्थ्यांनी आधीच खाते उघडले असल्यास तोच खाते क्रमांक टाकुन Online शिष्यवृत्ती फॉर्म भरता येतो. Online फॉर्म विद्यार्थ्यांनीच भरुन त्याची प्रिंट आऊट प्रत प्रमाणपत्राच्या आवश्यक सत्यप्रतीसह फोटो सहित महाविद्यालयात जमा करावी.**

असुसूचित जाती-जमाती, भटक्या जाती-जमाती आदींना त्यांच्या उत्पन्नाच्या आधारावर शिष्यवृत्ती मिळते. भारत सरकारच्या शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क भरण्याची गरज नाही.

| अ. क्र. | शिष्यवृत्ती | अट | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय शिष्यवृत्ती NT / SBC / OBC करिता | वर्गीकृत जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,००० पेक्षा कमी असल्यास अशा विद्यार्थ्यांनी | १. विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला<br>२. मागील वर्षाची मार्कलिस्ट<br>३. वडिलांचा उत्पन्नाचा दाखला<br>४. इतर जिल्ह्यांतून आल्यास जिल्हा बदली प्रमाणपत्र<br>५. बँक खात्याच्या पासबुकाची छायांकित प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्कॉलरशिपसाठी अर्ज करावा. यापेक्षा जास्त उत्पन्न असल्यास विद्यार्थ्यांनी फ्रिशिपसाठी अर्ज करावा. | ६. आधारकार्ड बँकेशी लिंक केल्याचे प्रमाणपत्र<br>७. एस.एस.सी.गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत<br>८. अधिवास प्रमाणपत्र (Domecial Certificate) |
| २ | SC / ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप | या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.२,००,००० पेक्षा कमी असल्यास अशा विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिपसाठी अर्ज करावा. यापेक्षा जास्त असल्यास विद्यार्थ्यांनी फ्रिशिपसाठी अर्ज करावा. | १. विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला<br>२. पालकांचा उत्पन्नाचा दाखला<br>३. मागील वर्षाची मार्कलिस्ट<br>४. बँक खात्याच्या पासबुकाची छायांकित प्रत |
| ३ | प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यास शुल्क माफी | आई किंवा वडील मान्यताप्राप्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत शिक्षिका किंवा शिक्षक | १. शिक्षणाधिकाऱ्याने प्रमाणित केलेला<br>२. पालकांच्या नोकरीचा दाखला<br>३. गुणपत्रिका |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आर्थिक मागासवर्ग शुल्क सवलत | पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.२,५०,००० पेक्षा कमी | १. पालकांना नोकरी असल्यास वेतनाचा दाखला<br>२. उत्पन्न रोजगारीने असल्यास तहसीलदाराचे अथवा शेतीमधुन असल्यास सरपंचाचा दाखला<br>३. गुणपत्रिकेची प्रत |
| ५ | स्वातंत्र सैनिक | स्वातंत्र सैनिक म्हणुन | १. स्वातंत्र सैनिक – महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र<br>२. गुणपत्रिकेची प्रत |
| ६ | अन्य शिष्यवृत्ती नुतनीकरण | मागील वर्षी त्या शिष्यवृत्तीची मान्यता असेल तर | १. गुणपत्रिकेची छायांकित प्रत |
| ७ | आजी–माजी सैनिकांचे पाल्य शुल्क सवलत | पालक भारतीय आजी किंवा माजी सैनिक | १. नोकरीचा दाखला<br>२. गुणपत्रिकेची प्रमाणित प्रत (अर्ज विद्यार्थ्यांने जिल्हा सैनिक अधिकारी कार्यालयामधुन आणावेत.) |
| ८ | **महाराष्ट्र शासनाची खुली शिष्यवृत्ती :**<br>याशिवाय, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्यसकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याकरीता १२ वी परिक्षेत ५०% वा अधिक गुण प्राप्त केलेले असावे. त्यासाठी १६ ऑगस्टपुर्वी आवेदनपत्र सादर करावे लागेल. | | |
| ९ | **विद्यापीठ विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती :**<br>या शिष्यवृत्तीसाठी १२ वी वा पदवी परिक्षेत ५०% वा त्यापेक्षा अधिक गुणप्राप्त केलेले असावे त्यासाठी १५ सप्टेंबरपूर्वी आवेदनपत्र सादर करावे लागेल.<br>B.A., B.Com तसेच M.A. भाग–१ प्रवेशीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी १२ वी वा पदवी परिक्षेत ५०% वा त्यापेक्षा अधिक गुणप्राप्त केलेले असावे त्यासाठी १५ सप्टेंबरपूर्वी आवेदनपत्र सादर करावे लागेल. | | |

## विद्यार्थ्यांना सूचना

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना विद्यापीठाचे अध्यादेश, नियम व परिनियमाची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. विशेषतः प्रवेशाकरिता विद्यापीठ अध्यादेशातील तरतूदी नीट समजून घेणे / माहिती असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयाचे नियम, आदेश व शिस्त पालन करणे आवश्यक आहे.

## पाठ्यक्रम

## वाङ्मय स्नातक

## बी.ए. भाग १,२ व ३–सत्रपध्दती

**टिप :** वैकल्पिक विषयांकरिता / माध्यमांकरिता शासनाने त्रीवर्षीय पदवी वर्गांसाठी किमान विद्यार्थी संख्या २४ निर्धारीत केलेली आहे. म्हणून ज्या विषयाच्या इंग्रजी वा हिंदी माध्यमाच्या वर्गात विद्यार्थी संख्या २४ पेक्षा कमी असेल तो विषय विद्यार्थ्यांना बदलून घ्यावा लागेल. कला आणि समाजविज्ञान विद्याशाखेतील विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विषयांच्या जेवढ्या गटांची सोय महाविद्यालयाच्या वेळापत्रकात करण्यात आली आहे तेच गट विद्यार्थ्यांना घेता येतील.

**कला शाखेतील विद्यार्थ्यांना सत्र पध्दतीमध्ये विद्यापीठ परीक्षेसाठी अंतर्गत मूल्यमापन/मौखिक परीक्षा देणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेसोबतच त्यांना अंतर्गत मुल्यमापन व मौखीक परीक्षा या मध्येही उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.**

अंतर्गत मुल्यमापन म्हणजे शिक्षकांनी दिलेला गृहपाठ (Assignment) तसेच त्यांची होणारी मौखीक परीक्षा (Viva-Voce) आणि त्यांची वर्गातील उपस्थिती यांचा समावेश होतो त्या आधारे त्यांना अंतर्गत गुणदान संबंधीत विषयशिक्षक करतील त्यासाठी दिलेल्या वेळेत आपल्या (Assignment) पूर्ण करून वर्गात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनामध्ये गृहपाठ व वर्ग–चाचणी असे २० गुणदान संबंधीत विषय शिक्षक करतील अंतर्गत मुल्यमापनासाठी विद्यार्थ्यांनी वर्गात हजर राहणे गरजेचे आहे अन्यथा अंतर्गत मुल्यमापनाचे गुणदान होणार नाही.

बी.ए. व बी.कॉम च्या विद्यार्थ्यांचे प्रत्येक सत्रात स्वतंत्रपणे मूल्यमापन केले जाते. म्हणजेच वर्षातुन दोन वेळा अंतर्गत मुल्यमापन केले जाईल व दोन्हीही अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम-कलास्नातक

**बी.ए.भाग -१** करीता विद्यार्थ्यांनी खालील २ गटापैकी एका गटाची निवड करावी
(सत्र पध्दती) व ऐच्छीक विषयापैकी फक्त ३ विषय प्रवेश अर्जात लिहावे.

आवश्यक विषय : इंग्रजी व मराठी

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) इतिहास | १) राज्यशास्त्र |
| २) मराठी वाङ्:मय | २) समाजशास्त्र |

**टिप : १) अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र व इंग्रजी वाङ्:मय या तीन विषयांपैकी एक कोणताही विषय विद्यार्थ्यांना अ-गट किंवा ब-गटामध्ये घेता येईल.**
**२) गृहअर्थशास्त्र हा विषय फक्त मुलींकरिता राहील.**

**बी.ए.भाग -२** आवश्यक विषय : इंग्रजी, मराठी व पर्यावरण शास्त्र
(सत्र पध्दती) बी.ए.भाग-१ ला निवडलेले किंवा घेतलेले विषय

**बी.ए.भाग -३** आवश्यक विषय : इंग्रजी व मराठी
(सत्र पध्दती) बी.ए.भाग-२ ला निवडलेले किंवा घेतलेले विषय

**टिप - प्रथम वर्ष प्रथम सेमीस्टरला घेतलेले विषय पुढील सत्रात व पुढील वर्षात बदलविता येणार नाही.**

## वाङ्मय पारंगत

### पदवी व पदव्युत्तर पाठ्यक्रम - सत्र पध्दती

**प्रवेश समिती पदवी वर्गासाठी :**

**प्रा. पी. आर. वानखडे**

**प्रा. डी. डी. कोल्हे**

**प्रवेश समिती पदव्युत्तर वर्गासाठी :**

**श्री.दिवाकर पवार** सेवानिवृत्त अधिक्षक

## वाणिज्य स्नातक

# बी. कॉम. भाग १, २ व ३ (सत्र पध्दती)

| बी.कॉम.भाग-१ (सत्र पध्दती) | | बी.कॉम.भाग-२ (सत्र पध्दती) | | बी.कॉम.भाग-३ (सत्र पध्दती) | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम सत्र (Sem-I) | द्वितीय सत्र (Sem-II) | प्रथम सत्र (Sem-III) | द्वितीय सत्र (Sem-IV) | प्रथम सत्र (Sem-V) | द्वितीय सत्र (Sem-VI) |
| १) इंग्रजी - १००१ | १) इंग्रजी - १००१ | १) इंग्रजी -१००१ | १) इंग्रजी - १००१ | १) इंग्रजी - १००१ | १) इंग्रजी - १००१ |
| २) मराठी - १०११ | २) मराठी - १०११ | २) मराठी -१०११ | २) मराठी - १०११ | २) मराठी - १०११ | २) मराठी - १०११ |
| ३) Principles of Economics -3011 | ३) Business Economics - 3021 | ३) Company Accounting- 3031 | ३) Corporate Accounting - 3041 | ३) Cost of Account - 3051 | ३) Management Accounting - 3061 |
| ४) Advanced Accountancy -3012 | ४) Financial Acc-ounting - 3022 | ४) Business Mathematics -3032 | ४) Business Statistics - 3042 | ४) Business Environment - 3052 | ४) Economics of Development - 3062 |
| ५) Principles of Business Organization- 3013 | ५) Principles of Business Management - 3023 | ५) Auditing -3033 | ५) Income Tax - 3043 | ५) Business Regula-tory Framework - 3053 | ५) Company Law - 3063 |
| ६) Computer Fundamentals Operating System - I - 3014 | ६) Computer Fundamentals Operating System - II - 3024 | ६) Monitary System - 3034 | ६) Indian Financial System - 3044 | ६) Indian Insurance System - I - 3056 | ६) Indian Insurance System - 3066 |
| | | ७) Information Technology & Busi-ness Data Proce-ssing - I -3035 | ७) Information Technology & Busi-ness Data Proce-ssing - II -3045 | ७) Indian Banking System - I - 3057 | ७) Indian Banking System - 3067 |
| | | | ८) पर्यावरण शास्त्र | | |

## कला स्नातक

# एम.ए.मराठी भाग १ व २

| एम.ए.भाग-१ (Sem-I) | | एम.ए.भाग-१ (Sem-II) | | एम.ए.भाग-२ (Sem-III) | | एम.ए.भाग-२ (Sem-IV) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतीक पार्श्वभूमी (Aram Te 1818) Marathi Vangmyachi Sanskrutik Parshbhumi | 2501 | मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतीक पार्श्वभूमी (1818 to 1960) Marathi Vangmyachi Sanskrutik Parshbhumi | 2511 | उपयोजित मराठी Upyojit Marathi | 2521 | उपयोजित मराठी Upyojit Marathi | 2531 |
| साहित्य विचार Sahitya Vichar | 2502 | समिक्षा विचार Samiksha Vichar | 2512 | भाषाविज्ञान Bhashavidyanan | 2522 | भाषाविज्ञान Bhashavidyanan | 2532 |
| संत साहित्य Santsahitya | 2504 | लोकसाहित्य Loksahitya | 2515 | विशेष ग्रंथकार चोखामेळा Vishesh Granthkar Chokhamela | 2523 | भाषांतरीत मराठी साहित्य Bhashantarit Marathi Sahitya | 2535 |
| विशेष वाङ्‌मय प्रकार कविता Vishesh Vaangmay Prakar Kavita | 2506 | विशेष वाङ्‌मय प्रकार कादंबरी Vishesh Vaangmay Prakar Kadambari | 2516 | ग्रामिण साहित्य Graminsahitya | 2526 | आदिवासी साहित्य Aadiwasi Sahitya | 2537 |

## कनिष्ठ महाविद्यालय (कला व वाणिज्य विभाग)

सत्र २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रामध्ये वर्ग ११ वा व वर्ग १२ वा या अभ्यासक्रमाकरिता कला व वाणिज्य अशा दोनही पाठ्यक्रमाला प्रवेश देण्यात येईल.

**प्रवेश समिती :** **श्री. बी. व्ही. सरोदे,** समन्वयक

**कु. अमिता तायडे,** सदस्य

| वर्ग ११ वा व १२ वा (कला) | वर्ग ११ वा व १२ वा (वाणिज्य) |
|---|---|
| १. इंग्रजी | १. इंग्रजी |
| २. मराठी | २. मराठी |
| ३. अर्थशास्त्र | ३. अर्थशास्त्र |
| ४. राज्यशास्त्र | ४. पुस्तपालन व लेखाकर्म |
| ५. इतिहास | ५. सचिवाची कार्यपध्दती |
| ६. पर्यावरणशास्त्र | ६. पर्यावरणशास्त्र |
| ७. आरोग्यशास्त्र | ७. आरोग्यशास्त्र |
| ८. समाजशास्त्र | |

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.V.C.)

सत्र २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रामध्ये वर्ग ११ वा व वर्ग १२ वा या अभ्यासक्रमाकरिता खालील अभ्यासक्रमाला प्रवेश देण्यात येईल.

**१) इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी**

**२) ऑटोमोबाईल टेक्नालॉजी**

**३) हॉर्टीकल्चर**

**प्रवेश समिती :** **श्री. महेंद्र कंकाळे,** समन्वयक

**श्री. सतिश बेंद्रे,** सदस्य

**सौ. राजकन्या खणखणे,** सदस्य

फेसबूक इत्यादी सोशल मिडीयावर ट्रोल करतांना आढळल्यास मोबाईल जप्त करण्यात येईल.

● महाविद्यालयामध्ये वर्ग सुरु असतांना वर्गासमोरील व्हरांड्यातून निष्कारण फिरु नये वा परिसरात रेंगाळत राहु नये तसेच आपल्या तासांच्या व्यतिरिक्त कोणत्याही विद्यार्थी-विद्यार्थीनींनी वर्ग खोल्यांमध्ये थांबू नये.

● वाढदिवस साजरा करतांना केक कापून वर्ग घाणेरडा करता येणार नाही त्यासाठी ५०० रूपये दंड ठोठावण्यात येईल.

महाविद्यालयाने सन २०१३-१४ पासुन खालील व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. पालक व विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाची दखल घेवून स्वतःचे भविष्य उज्वल करावे. इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी, ऑटोमोबाईल टेक्नालॉजी, हॉर्टीकल्चर हे अभ्यासक्रम पुर्ण केल्यास विद्यार्थी खालीलप्रमाणे स्वयंरोजगार मिळु शकतात.

## इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी

१. इलेक्ट्रीकल मोटर दुरुस्तीकरिता स्वतःचा उद्योग सुरू करता येते.
२. इलेक्ट्रीकल वायरींग मटेरियल व उपकरणाची विक्री केंद्र सुरु करण्यास मदत होते.
३. उच्च शिक्षणासाठी (B.A., B.Com., B.Voc.) ला प्रवेश मिळतो.
४. इलेक्ट्रीक उद्योगात रोजगारांची संधी उपलब्ध होवू शकते.
५. घरगुती विद्युत वायरींग व उपकरणांची दुरुस्तीचा उद्योग सुरू करता येतो.
६. द्वितीय वर्ष इलेक्ट्रीक इंजीनिअरींग (Polytechnic Diploma) ला प्रवेश मिळतो.

## ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी

१. टु-व्हिलर, फोर व्हिलर वाहनांचे रिपेअरींग सेंटर सुरु करता येते.
२. वाहनांचे सर्व्हिसींग सेंटर सुरु करता येते.
३. ऑटो पार्ट्स चे विक्री केंद्र सुरु करता येते.
४. वर्कशॉप व आटोमोबाईल्स सेक्टर मध्ये नोकरी मिळविता येते.
५. उच्च शिक्षणासाठी (B.A., B.Com., B.Voc.) ला प्रवेश मिळतो.
६. द्वितीय वर्ष इलेक्ट्रीक इंजीनिअरींग (Polytechnic Diploma) ला प्रवेश मिळतो.

## हॉर्टीकल्चर (उद्यान विभाग)

१. सुधारीत पध्दतीने शेती, फळबाग योजनेचे प्रशिक्षण.
२. रोपवाटीका संचालन करता येते.
३. सुधारीत संकरीत वाणांची निर्मीती करता येते.
४. फुलझाडे / शोभीवंत झाडांचे विक्री सुरु करता येते.

५. शासनाचे फळबाग योजने अंतर्गत शेतकऱ्यांना सेवा प्रदान करता येते.

६. स्वयं रोजगार द्वारे सामाजिक सेवा देता येते.

५. उच्च शिक्षणासाठी (B.Sc.Bio.) ला प्रवेश घेता येतो.

## प्रवेश प्रक्रिया

कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष (वर्ग ११ वा) करिता प्रवेश घेण्या–करिता एस.एस.सी. (दहावी) च्या परिक्षेचा निकाल जाहिल झालेल्या दिनांकापासून १० दिवसांचे आत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर करावा. एकत्रित अर्जामधून गुणवत्तेनुसार प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची सूची सूचना फलकावर लावण्यात येईल व त्यानंतर दिलेल्या मुदतीच्या आत आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम करण्यात येईल.

**टिप :** कनिष्ठ महाविद्यालय द्वितीय वर्ष कला / वाणिज्य वर्गात जागा उपलब्ध असल्यास मर्यादित स्वरुपात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

## ● महाविद्यालयीन नियमाचा भंग केल्यास होणारे दंड ●

१) महाविद्यालयात प्लास्टीक वापरावर बंदी आहे. आढळल्यास दंड रू.१००/–

२) महाविद्यालयाचे ओळखपत्र हरविल्यास नविन ओळखपत्र मिळविण्याकरीता ५० रू. दंड आकारण्यात येईल.

३) मूळ शुल्क पावती हरविल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यासाठी कार्यालयात २५ रू. दंड भरून शुल्क प्रमाणपत्र घेता येईल.

४) महाविद्यालयाचा गणवेश परिधान केला नसल्यास प्रतिदिन रूपये १०/– दंड आकारण्यात येईल तसेच वर्षाच्या शेवटी १०० रू. दंड आकारण्यात येईल.

५) धुम्रपान, मद्यपान, अमली पदार्थाचे सेवन इत्यादी महाविद्यालयीन परिसरात आढळल्यास २०० रू. दंड आकारण्यात येईल.

६) महाविद्यालयीन मालमत्तेचे नुकसान केल्यास १०० रू. प्रत्येकी दंड व पोलीस केस करण्यात येईल.

७) केक कापून वाढदिवसाला वर्ग खोल्या घाणेरड्या केल्यास ५०० रू. दंड आकारण्यात येईल.

## राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.)

श्री. गाडगे महाराज महाविद्यालय महाराष्ट्र बटालीयनशी संलग्न असुन ५४ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र सेनेत प्रवेश देण्यात येतो. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना योजनेचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय नौदल / वायुदल छात्रसेनेतही भाग घेता येतो. ज्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये सहभागी व्हावयाचे असेल अशा विद्यार्थ्यांनी डॉ.राकेश बडगुजर (संचालक शा.शि.) यांच्याकडे अर्ज करावा. विद्यार्थ्यांर्थीनीसाठी राष्ट्रीय छात्र सेनेची स्वतंत्र शाखा असते. विद्यार्थीनी सुध्दा त्यामध्ये सहभागी होवू शकतात.

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

या योजने अंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थीनी मिळून २०० जणांना प्रवेश दिला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत शिबीरे व किमान घड्याळी १२० तास इतका वेळ सहभागी व्हावे लागेल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून यासाठी प्रोत्साहनपर गुण दिले जातात.

कार्यक्रम अधिकारी मुलांचे पथक – प्रा.डी.डी.शहाडे,

कार्यक्रम अधिकारी मुलींचे पथक – डॉ.आर.टी.देशमुख

## प्रोत्साहनपर गुणाचा तपशील.

राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, खेळ आणि क्रीडा, वक्तृत्व, नाट्य, संगीत, समाजसेवा इत्यादी पाठ्येत्तर कार्यक्रमासाठी सर्व शाखातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण देण्याची तरतूद अमरावती विद्यापीठाने केली आहे. मात्र विद्यांर्थ्याला या विशेष गुण योजने अंतर्गत जास्तीत जास्त दहापर्यंत प्रोत्साहनपर गुण देण्यात येतात. विद्यापीठ परीक्षेचा निकाल लावतांना उत्तीर्णतेच्या सिमारेषेच्या खाली असलेल्या एका विषयात किंवा सर्व विषय मिळून जास्तीत जास्त पाच प्रतिशत गुणापर्यंत हे प्रोत्साहनपर गुण मिळविले जातात. स्नातक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रोत्साहनपर गुण पुढील प्रमाणे दिले जातील–

## प्रोत्साहन पर गुण तक्ता

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अ) संपूर्ण वर्षभर राष्ट्रीय छात्र सेनेतील सहभाग | – | ५ गुण |
| | ब) बी सर्टिफीकेट परीक्षा उत्तीर्ण | – | २ गुण |
| | क) सी सर्टिफीकेट परीक्षा उत्तीर्ण | – | २ गुण |
| | ड) गणराज्य दिन संचलनासाठी निवड | – | ३ गुण |
| २. | अ) संपूर्ण वर्षभर रा.से.यो. तील १२० तास सहभाग | – | ५ गुण |
| | ब) एका शिबीरासह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – | ६ गुण |
| | क) दोन शिबीरासह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – | ७ गुण |
| ३. | अ) विद्यापीठ स्तरावरील क्रिडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – | ३ गुण |
| | ब) आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – | ५ गुण |
| ४. | अ) विद्यापीठाने मान्यता दिलेल्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धामधील सहभाग (वाद–विवाद, नाटक, संगीत : प्रत्येक स्पर्धेसाठी) | – | ३ गुण |
| | ब) आंतरविद्यापीठ स्तरावरील वर नमुद केलेल्या सांस्कृतीक स्पर्धांमधील सहभाग | – | ४ गुण |
| ५. | अ) रक्तदान (प्रत्येक वेळेसाठी) | – | २ गुण |
| | ब) कमाल गुण | – | ५ गुण |
| ६. | अ) शासकीय योजनेअंतर्गत आवश्यक असाणरी सांख्यीकीय माहीती संकलीत करण्यामधील सहभाग | – | ५ गुण |
| ७. | अ) गृहरक्षक दलातील सहभाग | – | ३ गुण |
| | ब) गृहरक्षक दलातील कॅम्पसहीत सहभाग | – | ५ गुण |

## महिला तक्रार निवारण समिती

**(Women's Grievance Committee) परिशिष्ट ब पहावे.**

